दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

**आजचे पंचांग**

शुक्रवार, दि. २० मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, द्वितीया रात्री २-३१ पर्यंत,
दिवस नक्षत्र–रेवती रात्री २-२८ पर्यंत,
चंद्र रास- मीन रात्री २-२८ पर्यंत,
सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

**'टीडीआर'वरून जुंपली!**

**पुणे**: टीडीआरच्या मुद्द्यांवरून प्रशासन आणि नगरसेवकांत पालिका सभेत खडाजंगी उडाली. वाहतूक कोंडीने मुख्य शहराबरोबर समाविष्ट गावेही प्रचंड मनस्ताप सहन करत आहेत. अनेक ठिकाणी रस्ते विकसित होणे अपेक्षित असून नागरिक स्वत: पुढाकार घेवून टीडीआरच्या मोबदल्यात जागा देण्यास तयार आहेत. मात्र, प्रशासन तीन-तीन वर्षे याबाबत काहीच निर्णय घेत नाहीत. विनाकारण फाईल अडवून जागा मालकांना त्रास देतात.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार , दि. २० मार्च, २०२६ | वर्ष - १ अंक - १७४ पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### हिमाचलमध्ये बर्फवृष्टी उत्साहाचे वातावरण

**शिमला** : बर्फवृष्टीनंतर हिमाचल प्रदेशात पर्यटकांच्या गर्दीत मोठी वाढ झाली असून, गुरुवारी नवरात्रीच्या पहिल्या दिवशी मनालीमध्ये प्रचंड गर्दी झाली होती आणि भाविकांनी शक्तिपीठे व इतर देवस्थानांना भेटी दिल्या. एकीकडे बर्फाचे शौकीन मनाली आणि अटल बोगद्याकडे निघाले होते, तर दुसरीकडे समृद्ध वर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी भाविकांनी देवी मंदिरांमध्ये मोठ्या संख्येने गर्दी केली होती. मनालीच्या पर्यटन आणि संबंधित उद्योगांशी निगडित लोकांनी हॉटेलमधील खोल्यांच्या आरक्षणात झालेल्या अचानक वाढीचे स्वागत केले.

### क्रॉस व्होटिंगप्रकरणी काँग्रेसची नोटीस

**चंदीगड** : सोमवारी झालेल्या राज्यसभा निवडणुकीत कथितपणे पक्षांतर करून मतदान केलेल्या हरियाणातील आपल्या चार आमदारांना काँग्रेसने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. अधिकृत भूमिकेचा अवमान केल्याचा संशय असलेल्या पाचपैकी चार आमदारांची नावे पक्षाने बुधवारी जाहीर केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. पाचव्या आमदाराचे नाव अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. "आम्ही पक्षाच्या चार आमदारांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे," अशी माहिती राज्य काँग्रेस शिस्तपालन समितीचे अध्यक्ष धरमपाल मलिक यांनी दिली.

### मथुरा, वाराणसी येथील मंदिरांमध्ये गर्दी


**मथुरा/वाराणसी:** चैत्र नवरात्रीला सुरुवात झाल्याने गुरुवारी उत्तर प्रदेशातील मंदिरांमध्ये भाविकांनी गर्दी केली, मथुरा आणि वाराणसी येथील प्रमुख मंदिरांबाहेर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मथुरेत भाविकांनी देवी मंदिरांमध्ये फुले, नारळ आणि ओढणी अर्पण केली. २७ मार्च रोजी रामनवमीसोबत या उत्सवाची सांगता होईल. 'कलश स्थापना' आणि 'महाभिषेक' या विधींनी सुरुवात झाली असून, नैवेद्य अर्पण केले जात आहेत.

---

### पश्चिम आशियात शांतता, होर्मुझमध्ये सुरक्षित जलवाहतुकीवर भर

# मोदींची जागतिक कूटनीतिक आघाडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याशी स्वतंत्रपणे दूरध्वनीवरून चर्चा केली. या तिन्ही नेत्यांशी झालेल्या संवादात तणाव कमी करणे, संवाद आणि मुत्सद्देगिरीला प्राधान्य देणे, तसेच प्रदेशात शांतता आणि स्थैर्य पुनर्संचयित करण्याची गरज यावर एकमत झाल्याचे पंतप्रधान कार्यालयाने स्पष्ट केले.

पंतप्रधान कार्यालयाच्या अधिकृत माहितीनुसार, मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी पश्चिम आशियातील परिस्थितीवर चर्चा करत तातडीने तणाव कमी करण्याची आणि पुन्हा संवादाच्या मार्गावर परतण्याची गरज अधोरेखित केली. या संघर्षाबाबतची चिंता केवळ प्रादेशिक नसून व्यापक आंतरराष्ट्रीय स्वरूपाची असल्याचेही या चर्चेत स्पष्ट झाले.

ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक यांच्याशी झालेल्या चर्चेत पंतप्रधान मोदी यांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या आणि आखाती प्रदेशातील सध्याच्या घडामोडींवर सविस्तर चर्चा केली. तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरी हा एकमेव टिकाऊ मार्ग असल्याचे दोन्ही नेत्यांनी मान्य केले. भारताने ओमानच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेच्या उल्लंघनाचा निषेध व्यक्त केला, तसेच भारतीय नागरिकांसह हजारो लोकांच्या सुरक्षित परतीसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचे कौतुक केल्याचे अधिकृत निवेदनात नमूद आहे.

**भारताचा संवादावर भर**

● २८ फेब्रुवारी २०२६ रोजी अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांनंतर पश्चिम आशियात संघर्ष अधिक तीव्र झाला होता. त्या पार्श्वभूमीवर ओमानच्या सुलतानासोबत मोदी यांचा हा दुसरा संवाद आहे. याआधीही पंतप्रधानांनी सौदी अरेबिया, बहरीन, संयुक्त अरब अमिराती, जॉर्डन, इस्रायल आणि इराणसह अनेक देशांच्या नेत्यांशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

भारत आणि ओमान हे होर्मुझ सामुद्रधुनीत सुरक्षित आणि निर्बाध नौकानयनासाठी कटिबद्ध असल्यावरही भर देण्यात आला.

मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याशी बोलताना मोदी यांनी त्यांना आणि मलेशियाच्या जनतेला ईद-उल-फित्रच्या शुभेच्छा दिल्या. या चर्चेतही पश्चिम आशियातील अत्यंत चिंताजनक परिस्थितीवर चर्चा झाली आणि लवकरात लवकर शांतता व स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या मार्गावर भर देण्यात आला.

होर्मुझ सामुद्रधुनीचा मुद्दा या तिन्ही चर्चांमध्ये महत्त्वाचा ठरला. पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा आणि समुद्री वाहतुकीवर परिणाम होत असताना, सुरक्षित आणि निर्बाध जलवाहतूक सुरू राहणे भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मोदी यांनी स्पष्ट केल्याचे अधिकृत माहितीतून समोर आले आहे.

भारताच्या ऊर्जा सुरक्षेचा मोठा भाग आखाती प्रदेशाशी निगडित असल्याने नवी दिल्लीने या प्रश्नाकडे केवळ राजनैतिक नव्हे, तर आर्थिक आणि सामरिक दृष्टीनेही गांभीर्याने पाहिले आहे, असे या संवादांतून दिसून आले.

---

# गुढीपाडवा राज्यभर उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मराठी नववर्षाच्या स्वागतासाठी राज्यभर गुढीपाडवा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुंबई, ठाणे, नागपूरसह अनेक शहरांमध्ये भव्य शोभायात्रा, पारंपरिक कार्यक्रम आणि धार्मिक उपक्रमांमुळे आनंदोत्सवाचे वातावरण पाहायला मिळाले.

नागपूरमध्ये आयोजित शोभायात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले. यावेळी सामूहिक रामरक्षा पठणाचे आयोजन करण्यात आले होते. गुढीपाडवा हा आपल्या संस्कृतीतील महत्त्वाचा सण असल्याचे सांगत फडणवीस यांनी नव्या वर्षात सकारात्मक संकल्प करून पुढे जाण्याचे आवाहन केले. देशाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असेही ते म्हणाले. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या नागरिकांमुळे नागपूरमध्ये उत्साहपूर्ण आणि भगवामय वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, ठाण्यातील शोभायात्रेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहभाग घेतला. कोपीनेश्वर मंदिरातून पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. या वेळी आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे आणि खासदार नरेश मस्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ढोल-ताशे, लेझीम आणि पारंपरिक सादरीकरणांनी ठाण्यातील शोभायात्रेला रंगत आली, तर रस्त्यांवर नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. एकूणच, गुढीपाडव्याचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत असून पारंपरिक पद्धतीने नव वर्षाचे स्वागत करण्यात आलेले राज्यात सर्वत्र दिसून आले.

---

# पुण्यात वाहन नोंदणीत घट; दुचाकी, ईव्ही खरेदी मंदावली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : गुढी पाडव्याच्या पार्श्वभूमीवर वाहन खरेदीला दरवर्षी चालना मिळत असली, तरी यंदा पुण्यात वाहन नोंदणीत घट झाल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा दुचाकी, चारचाकी आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या नोंदणीत घसरण दिसून आली आहे.

१८ मार्च २०२५ ते २८ मार्च २०२५ या कालावधीत एकूण १३ हजार १९० वाहनांची नोंदणी झाली होती. तर ७ मार्च २०२६ ते १९ मार्च २०२६ या कालावधीत ही संख्या ११ हजार ९३७ इतकी राहिली. दुचाकी वाहनांमध्ये सर्वाधिक नोंदणी झाली असली, तरी त्यातही घट झाली आहे. मागील वर्षी ८ हजार २६० मोटारसायकलींची नोंद झाली होती. यंदा ही संख्या ७ हजार ९८६वर आली आहे. चारचाकी वाहनांमध्येही मंदीचे चित्र दिसून आले असून, मोटार कारची नोंदणी ३ हजार ३३२ वरून २ हजार ६६०पर्यंत खाली आली आहे. बस, ऑटो रिक्षा, मालवाहू वाहने आणि ट्रॅक्टर यांच्या नोंदणीतही घट झाली आहे. मात्र, टुरिस्ट टॅक्सी आणि इतर या प्रकारांमध्ये किंचित वाढ नोंदवण्यात आली आहे.

दरम्यान, इलेक्ट्रिक वाहनांच्या नोंदणीतही लक्षणीय घट दिसून आली आहे. २०२५ मध्ये २ हजार १२४ इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी झाली होती, तर २०२६ मध्ये ही संख्या १ हजार ५३०वर घसरली आहे. विशेषतः इलेक्ट्रिक दुचाकी आणि कारच्या नोंदणीत घट झाल्याचे दिसते.

गुढी पाडव्याच्या काळात अपेक्षित असलेला वाहन खरेदीचा उत्साह यंदा तुलनेने कमी राहिल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होत असून, बाजारातील मंदी किंवा आर्थिक दबावाचा त्यावर परिणाम झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

### आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांच्याकडे धुरा

# अशोक खरात प्रकरणाचा तपास एसआयटीकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक** : कॅप्टन अशोक खरात प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून, राज्य शासनाने या संपूर्ण प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. लैंगिक शोषण, अश्लील व्हिडिओंद्वारे धमकी आणि कोट्यवधी रुपयांच्या खंडणीच्या आरोपांमुळे प्रकरणाचे गांभीर्य वाढल्याने तपास आता थेट उच्चस्तरावर नेण्यात आला आहे.

या विशेष तपास पथकाच्या प्रमुखपदी महिला आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विविध ठिकाणी वेगवेगळे गुन्हे दाखल झाल्याने तपास एकत्रित, समन्वित आणि प्रभावी पद्धतीने करण्याची गरज ओळखून हा



निर्णय घेण्यात आल्याचे समजते. या प्रकरणी नाशिक शहर, नाशिक ग्रामीण आणि अहिल्यानगर परिसरात मिळून तीन स्वतंत्र गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

सरकारवाडा पोलीस ठाण्यात ३५ वर्षीय महिलेच्या लैंगिक शोषणाची तक्रार दाखल आहे. वावी पोलीस ठाण्यात अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तब्बल पाच कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप नोंदवण्यात आला आहे. तर शिर्डी पोलीस ठाण्यात अश्लील फोटो व्हायरल करण्याच्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे हे प्रकरण केवळ लैंगिक अत्याचारापुरते मर्यादित न राहता, ब्लॅकमेलिंग, डिजिटल धमक्या आणि आर्थिक गुन्हे अशा अधिक व्यापक स्वरूपाचे असल्याचे स्पष्ट होत आहे.

राज्य शासनाच्या आदेशानुसार, संबंधित सर्व पोलीस ठाण्यांना या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे, पुरावे आणि केस डायरी तात्काळ एसआयटीकडे हस्तांतरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तपासाची प्रगती नियमितपणे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर सादर करण्यासही सांगण्यात आले आहे. त्यामुळे या तपासावर थेट आणि बारकाईने नियंत्रण ठेवले जाणार आहे.

दरम्यान, गुन्हे शाखेच्या युनिट १ ने बुधवारी पहाटे कारवाई करत अशोक खरात याला अटक केली. न्यायालयाने त्याला २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान कॅनडा कॉर्नर येथील त्याच्या कार्यालयातून जप्त करण्यात आलेल्या पेन ड्राइव्हमध्ये ५८ व्हिडिओ आढळल्याची माहिती समोर आली आहे. या डिजिटल पुराव्यांमुळे तपासाचे स्वरूप आणखी गंभीर झाले आहे.

धार्मिक आस्था, दैवी शक्ती आणि श्रद्धेचा आधार घेत महिलांना जाळ्यात ओढल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. त्यातच ब्लॅकमेलिंग आणि खंडणीचे आरोप समोर आल्याने मोठ्या रॅकेटचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एसआयटीच्या सखोल तपासातून आणखी पीडित महिला पुढे येण्याची, तसेच अनेक धक्कादायक तपशील उघड होण्याची शक्यता तपास यंत्रणांकडून नाकारली जात नाही.

दरम्यान, या प्रकरणावरून राजकीय वातावरण तापले असून, संभाजीराजे छत्रपती यांनी महाराष्ट्रात अशा प्रकारचे प्रकार घडणे निंदनीय असल्याचे म्हटले आहे. त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांनी रुपाली चाकणकर यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणीही केली आहे. यावर कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी रुपाली चाकणकर यांची बाजू घेतली असून, या प्रकरणात त्यांचा कोणताही दोष नसल्याचे स्पष्ट केले आहे.

---

### तेलदरवाढ, होर्मुझ संकटाने शेअर बाजार हादरला

# सेन्सेक्स तब्बल २,४९७ अंकांनी कोसळला...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा आणि कच्च्या तेलाच्या भडकलेल्या किमतींचा फटका गुरुवारी भारतीय शेअर बाजाराला जोरदार बसला. ऊर्जा पायाभूत सुविधांवरील हल्ले, होर्मुझ सामुद्रधुनीतील नाकेबंदी, अमेरिकन फेडरल रिझर्व्हची कठोर भूमिका, रुपयाचे अवमूल्यन आणि परदेशी गुंतवणूकदारांची विक्री या सगळ्या घटकांच्या दबावाखाली बाजारात मोठी पडझड झाली.



दिवसभराच्या व्यवहारात सेन्सेक्स २,४९७ अंकांनी म्हणजेच ३.२६ टक्क्यांनी घसरून ७४,२०७ अंकांवर बंद झाला. निफ्टी ५० देखील ७७६ अंकांनी म्हणजे ३.२६ टक्क्यांनी घसरून २३,००२ अंकांवर स्थिरावला. व्यवहारादरम्यान सेन्सेक्सने ७३,९५१ अंकांचा नीचांक गाठला, तर निफ्टी २२,९३० अंकांपर्यंत खाली आला. जून २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर निफ्टीतील ही सर्वात मोठी घसरण मानली जात आहे. या पडझडीमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे १२.५० लाख कोटी रुपयांची घट झाली. बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४३८.६३ लाख कोटी रुपयांवरून ४२६.१३ लाख कोटी रुपयांवर आले. दरम्यान, रुपयावरही दबाव कायम राहिला आणि तो ५२ आठवड्यांच्या नीचांकी पातळीवर ९३.१३ वर बंद झाला. कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल ११९ डॉलरच्या आसपास पोहोचल्याने महागाई आणि आर्थिक वाढीबाबतच्या चिंतेत आणखी भर पडली.

मध्यपूर्वेतील ऊर्जा सुविधांवरील हल्ल्यांमुळे तेलाच्या किमती पुन्हा भडकल्या आणि त्यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास ढासळला. त्यात अमेरिकन फेडरल रिझर्व्हनेही कठोर भूमिका कायम ठेवल्याने देशांतर्गत बाजाराने मागील तीन दिवसांची वाढ गमावत मोठ्या घसरणीसह सत्र संपवले, असे विश्लेषकांनी सांगितले.

---

### पंतप्रधान मोदींच्या देशवासियांना शुभेच्छा

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी महाराष्ट्र आणि गोव्यातील जनतेला गुढीपाडव्याच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या आणि हा सण संकटांवर सत्याच्या विजयाचे प्रतीक असल्याचे म्हटले. पश्चिमेकडील दोन राज्यांतील लोकांना लिहिलेल्या एकसारख्या पत्रांमध्ये मोदी म्हणाले की, भारत जसजसा प्रगती आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने आपला प्रवास सुरू ठेवत आहे, तसतसे गुढीपाडव्याचे महत्त्व अधिकच वाढते. नवीन वर्षाची सुरुवात दर्शवणारा हा पवित्र सण, नवी आशा आणि नव्या सुरुवातीचे वचन देणारा काळ आहे, असे ते म्हणाले.

---

# संघाचे वाढत्या कामासाठी विकेंद्रीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचा विस्तार सातत्याने वाढत असून, समाजाच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संघाने संघटनात्मक पातळीवर विकेंद्रीकरणाचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याची माहिती सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी गुरुवारी दिली.

येथे एका कार्यक्रमात बोलताना डॉ. भागवत यांनी बदलत्या काळानुसार संघाच्या कार्यपद्धतीत केलेल्या बदलांवर भाष्य केले. संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बदल आवश्यक झाल्याचे ते म्हणाले. एखाद्या संघटनेचा विस्तार



वाढला की, कामकाज सुरळीत आणि प्रभावीपणे चालवण्यासाठी विकेंद्रीकरण ही नैसर्गिक प्रक्रिया ठरते, असे भागवत यांनी सांगितले. त्यानुसार, आतापर्यंत प्रशासकीय सोयीसाठी असलेली ४६ प्रांतांची रचना आता अधिक सूक्ष्म करण्यात आली असून, त्याऐवजी ८६ भागांची नवी रचना करण्यात आली आहे. या नव्या रचनेमुळे वरिष्ठ स्तरावर घेतले जाणारे निर्णय आणि उपक्रम आता अधिक लहान घटकांमार्फत प्रभावीपणे राबवता येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मात्र, हे बदल केवळ प्रशासकीय स्वरूपाचे असून, मैत्री करणे आणि स्वतःच्या उदाहरणातून समाज परिवर्तन घडवणे, ही संघाची मूळ कार्यपद्धती कायम राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

आजच्या पिढीचा कल राष्ट्रसेवा आणि प्रामाणिकपणाकडे असल्याचे सांगत भागवत यांनी 'जेन झी'शी जोडले जाण्यासाठी सोशल मीडियाच्या प्रभावी वापराचे समर्थन केले. विरोधी विचारांचे लोकही आता संघाच्या कामाचा आदर करू लागले आहेत, ही समाधानाची बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचीही उपस्थिती होती.


---

### केंद्र सरकारचे स्पष्टिकरण; पश्चिम आशियातील युद्धाचा परिणाम

# एलपीजीबाबत चिंता, मात्र देशात तुटवडा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियात जवळपास तीन आठवड्यांपासून सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली असून, त्याचे पडसाद भारतातही उमटत आहेत. केंद्र सरकारकडून सातत्याने जनतेला शांतता राखण्याचे आवाहन केले जात असले, तरी एलपीजी पुरवठ्याबाबतची चिंता कायम आहे. अशा पार्श्वभूमीवर पेट्रोलियम मंत्रालयाने गुरुवारी स्पष्ट केले की, एलपीजीची परिस्थिती चिंताजनक असली तरी सध्या देशात कोणताही तुटवडा नाही. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू



मंत्रालयाच्या सहसचिव सुझाता शर्मा यांनी सांगितले की, देशातील कच्च्या तेलाचा साठा पुरेसा आहे आणि रिफायनऱ्यांचे कामकाजही सुरळीत सुरू आहे. पेट्रोल पंपांवर इंधनाचा तुटवडा नाही, तसेच घरगुती पीएनजी आणि वाहनांसाठी सीएनजीचा पुरवठाही अखंडित सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एलपीजीवरील वाढता ताण कमी करण्यासाठी सरकारने व्यावसायिक ग्राहकांना शक्य तितक्या प्रमाणात एलपीजीऐवजी सीएनजी किंवा पीएनजीकडे वळण्याचे आवाहन केले आहे.
कंपन्यांनाही या दिशेने प्रोत्साहन दिले जात असल्याचे सुजाता शर्मा यांनी नमूद केले.
या प्रयत्नांना काही प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचेही मंत्रालयाने सांगितले. गेल्या दोन आठवड्यांत सुमारे १.२५ लाख नवीन घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक पीएनजी जोडण्या देण्यात आल्या आहेत. तर गेल्या तीन दिवसांत ५,६०० हून अधिक एलपीजी ग्राहकांनी पीएनजीकडे वळण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले. केंद्र सरकारने सर्व राज्यांना १० टक्के अतिरिक्त व्यावसायिक पीएनजी पुरवठ्याचे आश्वासन दिले असून, त्यामुळे पीएनजी जाळे अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.
सुझाता शर्मा यांनी मान्य केले की, पश्चिम आशियातील युद्धामुळे एलपीजीची परिस्थिती नक्कीच चिंताजनक आहे. तेल शुद्धीकरण प्रकल्प आणि कच्च्या तेलाच्या साठ्यांवर होणारे हल्ले ही चिंतेची बाब असल्याचे त्यांनी म्हटले. मात्र, सध्या कोणत्याही वितरकाने तुटवड्याची तक्रार केलेली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.
या संकटावर परराष्ट्र मंत्रालयानेही भाष्य केले. मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पश्चिम आशियातील युद्धामुळे केवळ भारतातच नव्हे, तर जगातील अनेक देशांमध्ये ऊर्जा संकट निर्माण झाल्याचे म्हटले. कतार भारताला ४० टक्क्यांहून अधिक एलपीजीचा पुरवठा करतो, आणि तेथील रिफायनऱ्यांवर हल्ले झाल्यास तसेच होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्यास भारतावर थेट परिणाम होतो, असे त्यांनी स्पष्ट केले. तथापि, सरकार पर्यायी पुरवठा मार्ग आणि स्रोत शोधण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचे आश्वासन देण्यात आले आहे. एकूणच, एलपीजीबाबतची परिस्थिती तणावपूर्ण असली तरी सध्यातरी पेट्रोल, डिझेल, पीएनजी, सीएनजी आणि घरगुती गॅस पुरवठा नियमित सुरू असल्याचा सरकारचा दावा आहे.

---

# नाशिक जिल्हा परिषदेत लाचखोरी; महिला अधिकाऱ्यासह दोघे अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक** : जिल्हा परिषदेत १६ लाखांचे बिल मंजूर करून देण्यासाठी ७२ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कार्यकारी अभियंता वैशाली ठाकरे आणि वरिष्ठ सहाय्यक अरुण धारणकर यांना ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली. ही कारवाई १८ मार्च रोजी जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारतीत करण्यात आली.

लघु पाटबंधारे विभागातील दुरुस्ती कामाचे बिल काढून देण्यासाठी एका कंत्राटदाराकडून सुरुवातीला ७२ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. नंतर तडजोडीअंती ५० हजार रुपये देण्याचे ठरले. त्यानुसार सापळा रचून एसीबीने दोघांना पकडले.

वैशाली ठाकरे यांच्याबद्दल यापूर्वीही ठेकेदारांमध्ये कमालीचा असंतोष होता. कामाच्या निमित्ताने भेटायला येणाऱ्या ठेकेदारांशी अत्यंत उद्धटपणे वागणे आणि अर्वाच्य भाषेचा वापर करणे, अशा तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. गेल्या पंधरा दिवसांतील ही एसीबीची दुसरी मोठी कारवाई आहे. यापूर्वी जीएसटी विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याला २० लाखांची लाच घेताना अटक करण्यात आली होती. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. शासकीय कामासाठी कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी न घाबरता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागाकडून करण्यात आले आहे.

## संपादकीय

# हॉर्मुझ सामुद्रधुनी आणि भारताची कुटनीती



**हॉर्मुझच्या सामुद्रधुनीभोवती तणाव वाढला की, त्याचे पडसाद मध्य पूर्वेपुरते मर्यादित राहत नाहीत. तेल, व्यापार, सागरी मार्ग, परराष्ट्रधोरण आणि महासत्तांचे दडपण या साऱ्यांच्या छेदबिंदूवर भारत उभा राहतो. त्यामुळे अशा वेळी मोजून टाकलेले प्रत्येक पाऊल महत्त्वाचे ठरते.**

हॉर्मुझच्या संदर्भातील अमेरिकेची मांडणी ही सुरक्षारक्षणाच्या दाव्यापेक्षा सामरिक जुगार अधिक ठरते आहे. अमेरिकेने स्वतःला आखाती राज्यांचा सुरक्षा हमीदार म्हणून अनेक वर्षे उभे केले. परंतु प्रत्यक्ष संकटाच्या वेळी त्या हमीची मर्यादा उघडी पडते, हे आता स्पष्ट झाले आहे. अमेरिकेच्या या भूमिकेवरचा आखाती देशांचा विश्वास ढासळत असून, प्रादेशिक देश आपापली चूल वेगळी मांडू लागला आहे. भारतासाठी या घडामोडींचे महत्त्व उघड आहे. कारण भारताच्या ऊर्जा गरजांचा मोठा भाग आखाती प्रदेशाशी जोडलेला आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे भारताचा व्यापारी सागरी प्रवाह, परदेशस्थ भारतीयांचे हित आणि व्यापक पश्चिम आशिया धोरण हे सारे या प्रदेशातील स्थैर्यावर अवलंबून आहे. त्यामुळे भारताला संतुलन राखावे लागते. अमेरिका ही भागीदार; इराण हा ऐतिहासिक आणि भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाचा देश; अरब आखाताशी ऊर्जा आणि रोजगाराचे संबंध; इस्रायलशी संरक्षण-सहकार्य. यात गंमत अशी की, भारताची अडचण नवी नाही; पण परिस्थिती अधिक नाजूक झाली आहे. पूर्वी आखातातील तणाव म्हणजे तेलाचे दर वाढणे आणि जहाजवाहतुकीचा धोका, इतपत चर्चा होत असे. आता त्यात महासत्तांच्या उघड संलग्नतेमुळे आणि प्रादेशिक संघर्षांच्या नव्या रचनेमुळे अधिक गुंतागुंत आली आहे. अमेरिकेचा दृष्टिकोन आज 'सुरक्षे'पुरता उरलेला नाही; त्यात इस्रायलच्या सुरक्षेला प्राधान्य, इराणला रोखण्याची कसरत आणि आखाती मित्रराष्ट्रांना संदेश देण्याची राजकीय गरज मिसळलेली आहे. संकटकाळात अमेरिकन तळ कोणाच्या सुरक्षेला प्राधान्य देतात, यावरच आता प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. भारताच्या परराष्ट्रधोरणावर अनेकदा अशी टीका केली जाते. परराष्ट्रधोरण म्हणजे स्वतःचे हित कोणत्या टप्प्यावर कोणत्या शब्दांत जपायचे, याची शिस्त. भारताने आजवर पश्चिम आशियात हाच मार्ग स्वीकारला आहे. उगीच कोणाच्या छावणीत ठाम उभे राहण्यापेक्षा सर्वांशी कामकाजाचे संबंध ठेवणे, हा त्याचा प्रयत्न राहिला आहे. आता त्याच मार्गाची खरी कसोटी लागते आहे. तरीही या धोरणात काही मूलभूत उणिवा आहेत, हे मान्य करावे लागेल. पहिली म्हणजे ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न. आपण पर्याय शोधतो आहोत, नवीकरणीय ऊर्जेची भाषा करतो आहोत, पुरवठा विविधीकरणाबद्दल बोलतो आहोत; पण हॉर्मुझसारखा मार्ग अस्थिर झाला, तर भारतीय अर्थव्यवस्थेवर लगेच दडपण येते, ही वस्तुस्थिती आहे. तेलाचे दर वाढले की महागाई, चलनविषयक ताण, वाहतूक खर्च आणि उद्योगांवरील परिणाम यांची साखळी सुरू होते. म्हणजे आपल्या अर्थकारणाचा एक महत्त्वाचा दोरा अजूनही बाह्य धक्क्यांच्या हाती आहे. दुसरी उणीव म्हणजे सागरी सुरक्षेची. भारत हिंदी महासागरात स्वतःची मोठी भूमिका मांडतो. नौदलशक्ती, समुद्री देखरेख, व्यापारी मार्गांचे संरक्षण आणि 'नेट सिक्युरिटी प्रोव्हायडर'ची भाषा करतो. पण हॉर्मुझजवळील तणाव वाढला, की भारताची भूमिका अद्यापही प्रामुख्याने प्रतिक्रियात्मक दिसते. संकट आल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा संकटांची पूर्वतयारी हा आधुनिक सामर्थ्याचा भाग असतो. भारत संतुलन राखतो, हे खरे. पण संतुलन म्हणजे नेहमी मौन नसते. भारत अजूनही या पातळीवर थोडा संकोची दिसतो. जागतिक स्तरावर उभारी घेत असलेल्या देशाला केवळ सर्वांशी संबंध राखणे पुरेसे नसते; कधी कधी मूल्याधिष्ठित आणि व्यवहार्य अशी दोन्ही बाजू सांभाळणारी मांडणीही करावी लागते. हॉर्मुझ संकटाने आणखी एक गोष्ट स्पष्ट केली आहे. अमेरिकेवर अतिनिर्भर सुरक्षा व्यवस्थेचा काळ कमी विश्वासार्ह होत आहे. आखाती देशांनी हे लक्षात घेतले आहे. चीन, रशिया, तुर्की, इराण, इस्रायल, सौदी अरेबिया, यूएई अशा अनेक खेळाडूंच्या परस्पर समीकरणांत आता एकध्रुवीय हमीची जागा राहिलेली नाही. भारतानेही हा बदल ओळखला पाहिजे. याचा अर्थ अमेरिकेपासून दूर जाणे असा होत नाही; पण अमेरिकेच्या प्रत्येक सामरिक गणिताला आपोआप भारताचे हित समजणेही चूक ठरेल. या साऱ्या घडामोडीत भारताचे खरे आव्हान असे आहे की, त्याने सावधगिरी जपावी; पण निष्क्रियता टाळावी. संतुलन राखावे; पण अस्पष्टतेत हरवू नये. संबंध जपावेत; पण स्वतःचे सामरिक स्वातंत्र्य गमावू नये. हॉर्मुझसारख्या सामुद्रधुनीत जहाजे अडकतात तेव्हा केवळ तेलच थांबत नाही; अनेक देशांच्या परराष्ट्रधोरणांची खरी परीक्षा सुरू होते. भारताने ही परीक्षा सध्या संयमाने हाताळली आहे. पण संयम पुरेसा नाही. त्यामागे तयारी, स्पष्टता आणि स्वार्थसुसंगत दूरदृष्टीही लागते. अन्यथा सावध पाऊल आणि ठप्प चाल यातला फरक मिटायला वेळ लागत नाही.

# अर्थव्यवस्थेच्या वाढीला उत्पन्नवाढीचा अडसर

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालाने अपरिहार्य प्रश्न उपस्थित केला आहे : भारत कमी उत्पन्नाच्या सापळ्यातून बाहेर पडू शकेल का? या प्रश्नाचे आकर्षण त्यातल्या अर्थशास्त्रीय भाषेत नाही; तर तो भारताच्या विकासकथेतील मोठा फोलपणा उघड करतो म्हणून आहे. कारण गेली अनेक वर्षे देशात वाढ, पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती, परकीय गुंतवणूक, स्टार्टअप्स, उत्पादनवाढ अशा कितीही घोषणा होत असल्या, तरी त्यातून मोठ्या लोकसमूहाचे प्रत्यक्ष उत्पन्न किती वाढले, हा प्रश्न अजूनही ताठ उभाच आहे. संबंधित लेखातही वरच्या मध्यम-उत्पन्न गटात पोचायचे असेल, तर जागतिक आणि देशांतर्गत अडथळ्यांनाही तोंड देत उच्च आर्थिक वाढ सातत्याने राखावी लागेल, असे यात नमूद केले आहे.

भारताची अडचण ही वाढीचा दर्जा आहे. आकडेवारीवर प्रेम करणाऱ्यांना सकल देशांतर्गत उत्पादनाची वाढ पुरेशी वाटते. पण अर्थव्यवस्था वाढते म्हणजे समाज प्रगत होतोच, असे नसते. उत्पादन वाढते, पण रोजगार निर्माण होत नाहीत; निर्यात वाढते, पण ग्रामीण मागणी खुंटते; बाजार भव्य दिसतात, पण कुटुंबांचे खरेदीशक्तीवरचे बंधन तसेच राहते. तेव्हा 'विकास' हा शब्द अर्थशास्त्रीय परिषदांसाठी उपयोगी पडतो; पण सामान्यांच्या जगण्यात त्याचे रूपांतर होत नाही. भारताच्या सध्याच्या अवस्थेकडे पाहिले, तर हाच विसंवाद सर्वाधिक प्रकर्षाने जाणवतो. कमी उत्पन्नाचा सापळा हा काही केवळ आकड्यांचा विषय नाही. तो एक सामाजिक-आर्थिक अडथळा आहे. देशाची लोकसंख्या तरुण, बाजार मोठा, गुंतवणुकीची क्षमता अस्तित्वात, सेवा क्षेत्र सक्षम ही सारी भारताची बलस्थाने मानली जातात. उच्च वाढीची काही बेटे आहेत; पण विस्तीर्ण आर्थिक भूभाग अजूनही निमउत्पन्न, असंघटित कामगार, कमी उत्पादकता आणि अपुरी कौशल्ये यांच्या दलदलीत अडकलेला आहे.



**» भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढते, असे म्हटले जाते; पण वाढीचा हा वेग सामान्य माणसाच्या उत्पन्नात, रोजगारात आणि उपभोगशक्तीत कितपत उतरतो, हा खरा प्रश्न आहे. एक मोठा समाजघटक अद्याप कमी उत्पन्नाच्या कचाट्यातच अडकलेला आहे.**

यामागे अनेक कारणे आहेत आणि त्यांचा संबंध केवळ अर्थमंत्रालयाशी नाही. शिक्षणातील दर्जाहीनता, आरोग्यव्यवस्थेतील विषमता, शेतीतून उद्योग वा सेवाक्षेत्राकडे होणारा अपुरा संक्रमण, महिलांच्या कमी श्रमसहभागाचे प्रमाण, सूक्ष्म व लघुउद्योगांवरील वित्तीय ताण, न्यायव्यवस्थेचा विलंब, धोरणातील अनिश्चितता ही सारी वाढ खुंटवणारी चाके आहेत. देशात महामार्ग बांधले जातात, विमानतळ वाढतात, डिजिटल व्यवहारांचे विक्रम होतात; हे सारे आवश्यकच. उत्पन्नाच्या प्रश्नात आणखी एक गफलत सातत्याने केली जाते. मध्यमवर्गाचा विस्तार झाला, शहरे वाढली, उपभोगाचे बाजार बदलले, म्हणून देश समृद्धीकडे झेपावतो आहे, अशी एक धारणा जाणीवपूर्वक तयार केली जाते. परंतु वरच्या थरांतील तेजस्वी उपभोग आणि खालच्या थरांतील स्थिरावलेले उत्पन्न यांतील अंतर प्रचंड आहे. काही कोटी लोकांच्या खरेदीक्षमता आणि उरलेल्या कोट्यवधी लोकांच्या असुरक्षित अर्थजीवनात प्रगतीची एकसंध कथा सापडत नाही. यावर उपाय काय? सर्वप्रथम, उच्च वाढीचा आग्रह आवश्यक आहेच; पण तो अंध आग्रह नसावा. वाढ रोजगारक्षम असली पाहिजे. भांडवलकेंद्री प्रकल्पांपेक्षा मजूरप्रधान उद्योगांना चालना देणे, निर्यातक्षम उत्पादनवाढ, लघुउद्योगांसाठी वित्त आणि बाजारसाखळी, ग्रामीण क्रयशक्ती वाढवणारी धोरणे, आणि शिक्षण-कौशल्य यांतील प्रत्यक्ष सुधारणा या गोष्टी अपरिहार्य आहेत. आज भारतात उद्योगधंद्यांच्या चर्चा होतात; पण कामगारांच्या उत्पादकतेची, प्रशिक्षणाची आणि रोजगाराच्या गुणवत्तेची चर्चा कमी असते. हीच उणीव आहे. अर्थव्यवस्था 'मोठी' होण्याइतकेच 'घन' होणेही तितकेच महत्त्वाचे असते.

दुसरे म्हणजे, राज्यकर्त्यांनी आकडे आणि घोषणांच्या मोहातून बाहेर पडले पाहिजे. पाच ट्रिलियन, तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था, जागतिक उत्पादनकेंद्र ही लक्ष्ये राजकीय घोषणांसाठी उपयुक्त. पण प्रतिव्यक्ती उत्पन्न, कुटुंबाच्या खर्चयोग्य रकमेतील वाढ, बालपोषण, शिक्षणगुणवत्ता, महिलांचा रोजगार, शहरी आणि ग्रामीण कामगारांचे वास्तविक वेतन हे मापदंड विकासाची खरी चाचणी घेतात.

दुर्दैवाने सार्वजनिक चर्चेत यांना दुय्यम स्थान आहे. अर्थव्यवस्थेची मांडणी बहुधा राष्ट्रीय अभिमानाच्या स्वरूपात केली जाते; मानवी कल्याणाच्या कसोटीवर कमी.

तिसरे म्हणजे, भारताने जागतिक अडथळ्यांची सबब सांगत राहू नये. हो, जगात अनिश्चितता आहे. व्यापारसाखळ्या बदलत आहेत. भूराजकीय तणाव, महागाई, तंत्रज्ञानातील स्पर्धा, संरक्षणवाद हे सारे आहेच. परंतु सक्षम देश हे अडथळे नोंदवतात; त्यांना निमित्त बनवत नाहीत. भारताला आपल्या लोकसंख्येच्या लाभांशाचे कौतुक फार आहे; पण हा लाभांश कौशल्यहीन, अल्पउत्पन्न आणि अपुरोजगार तरुणांच्या रूपात असेल, तर तो शक्ती न ठरता संकट ठरतो.

भारत कमी उत्पन्नाच्या सापळ्यातून बाहेर पडू शकतो; पण त्यासाठी घोषणांनी नव्हे, तर कठोर सुधारणांनी, मानवी भांडवलात गुंतवणुकीने आणि समावेशक वाढीच्या आग्रहाने मार्ग काढावा लागेल. देशाच्या आर्थिक महत्त्वाकांक्षांना अर्थ तेव्हाच आहे, जेव्हा त्या बहुसंख्य भारतीयांच्या उत्पन्नवाढीत दिसतात. अन्यथा आपण मोठ्या अर्थव्यवस्थेचे नागरिक असू; पण लहान उत्पन्नाच्या वास्तवात जगत राहू.

# आयुक्तांकडून शहरातील विविध भागांची पाहणी

## स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि आरोग्य सेवांचा आढावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी बुधवारी सकाळी दुर्गादेवी टेकडीसह शहरातील विविध भागांची पाहणी करून स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा घेतला. कुदळवाडी, चिखली, पुनावळे, ताथवडे, रुपीनगर आणि त्रिवेणीनगर या परिसरांना त्यांनी प्रत्यक्ष भेट देत संबंधित यंत्रणांच्या कामकाजाची तपासणी केली.

दुर्गादेवी टेकडी परिसराची पाहणी करताना आयुक्तांनी तेथील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुविधांची स्थिती तपासली. परिसरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांचीही त्यांनी पाहणी करून त्यांची नियमित स्वच्छता, योग्य देखभाल आणि नागरिकांसाठी स्वच्छ व सुरक्षित वातावरण उपलब्ध ठेवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

दुर्गादेवी टेकडी हे शहराच्या वैभवात भर घालणारे महत्त्वाचे ठिकाण असून येथे मोठ्या संख्येने नागरिक भेट देत असतात. त्यामुळे येथे आवश्यक नागरी सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असणे गरजेचे असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. तसेच या परिसरात विविध प्रकारच्या वनस्पती आणि वृक्षप्रजाती आढळत असल्याने त्यांचे जतन आणि संवर्धन करण्यावरही त्यांनी भर दिला. पाहणीदरम्यान त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि अपेक्षा जाणून घेतल्या. याशिवाय सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रालाही त्यांनी भेट देत पाणी शुद्धीकरण प्रक्रियेची माहिती घेतली. त्यानंतर निगडीतील यमुनानगर आरोग्य कार्यालयात जाऊन तेथील कामकाजाचा आढावा घेतला. कार्यालयातील दैनंदिन हजेरी नोंदवही तपासत सर्व कर्मचाऱ्यांनी वेळेचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. नागरिकांना सेवा देताना कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

पाहणीदरम्यान सहाय्यक आरोग्य अधिकारी महेश आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक कांचनकुमार इंदलकर, आरोग्य निरीक्षक रामचंद्र शिंगाडे, सहाय्यक आरोग्य निरीक्षक रवी रोकडे आणि आरोग्य मुकादम मल्लिकार्जुन कुरवार आदी कर्मचारी उपस्थित होते.

# मनपा शाळांमध्ये कचरा विलगीकरणाचे धडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरात कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले जात असून, मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांना कचरा विलगीकरणाचे प्रत्यक्ष धडे दिले जात आहेत. शालेय स्तरावर पर्यावरणपूरक सवयी रुजवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना ओला, सुका, घरगुती घातक आणि सॅनिटरी अशा चार प्रकारांमध्ये कचरा वेगळा करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे.

भविष्यात जबाबदार आणि पर्यावरणाबाबत जागरूक नागरिक घडवण्यासाठी लहान वयातच योग्य सवयींची जडणघडण होणे आवश्यक असल्याचे महापालिकेचे मत आहे. मनपा शाळांमध्ये प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून कचरा विलगीकरणाबरोबरच होम कंपोस्टिंग प्रक्रियेचीही माहिती दिली जात आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून सांगितले जात आहे.

# स्पा केंद्रांवर लगाम; सूत्रधारांवरही कारवाईचे संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील स्पा आणि वेलनेस सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या अनैतिक प्रकारांचा मुद्दा मंगळवारी विधान परिषदेत जोरदार गाजला. पिंपरी-चिंचवडसह पुणे आणि इतर महानगरांतील अशा केंद्रांमागील सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात केली. त्यावर उत्तर देताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी पुढील तीन ते चार महिन्यांत स्पा व्यवसायासाठी स्वतंत्र आणि कडक नियमावली लागू केली जाईल, असे महत्त्वाचे आश्वासन दिले. लक्षवेधी सूचनेद्वारे हा विषय उपस्थित करताना अमित गोरखे यांनी स्पा व्यवसायाच्या आड देहव्यापार, मानवी तस्करी आणि अमली पदार्थांचे जाळे वाढत असल्याचा गंभीर आरोप केला. विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या शैक्षणिक व आयटी केंद्रांमध्ये हा प्रकार अधिक चिंताजनक बनल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस धाडी टाकतात, कारवाईही करतात; मात्र काही दिवसांत तेच चालक-मालक नव्या नावाने पुन्हा व्यवसाय सुरू करतात, असा आरोप गोरखे यांनी केला. त्यामुळे केवळ धाडसत्रे पुरेशी नसून, या साखळीमागील मुख्य सूत्रधारांवर थेट कारवाई होणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. विमाननगरमधील एका पीडित महिलेच्या मृत्यूचा उल्लेख करत त्यांनी हा विषय केवळ कायदा-सुव्यवस्थेचा नसून मानवी हक्क आणि महिला सुरक्षिततेचाही असल्याचे स्पष्ट केले. पिंपरी-चिंचवडमध्ये काही ठराविक लोकांची संघटित साखळी हा काळा व्यवसाय चालवत असल्याचा आरोपही त्यांनी केला. केवळ कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करून उपयोग नाही; तर मालमत्ता, आर्थिक व्यवहार आणि संपूर्ण नेटवर्कची चौकशी करून मूळ सूत्रधारांवर 'मकोका'अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. स्पा व्यवसाय सध्या 'शॉप ॲक्ट'च्या चौकटीत चालतो; मात्र या क्षेत्रासाठी स्वतंत्र नियमावली नसल्याने अनेक त्रुटींचा गैरफायदा घेतला जात असल्याचे गोरखे यांनी निदर्शनास आणले. त्यामुळे स्पा सेंटरसाठी स्वतंत्र कायदेशीर चौकट तयार करण्याची मागणीही त्यांनी सभागृहात केली.

यावर उत्तर देताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सरकार हा विषय अत्यंत गांभीर्याने घेत असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार यासंदर्भात समिती स्थापन करण्यात आली असून नगरविकास आणि ग्रामविकास विभागाचा अहवाल लवकरच येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. या अहवालाच्या आधारे पुढील तीन ते चार महिन्यांत स्पा सेंटरसाठी कडक अटी व निकष असलेली स्वतंत्र नियमावली लागू केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. महिलांना जाळ्यात ओढणाऱ्या एजंट आणि दलालांवर मूळापासून कारवाई केली जाईल, असेही कदम यांनी सांगितले. तसेच, संबंधितांवर 'मकोका'सारख्या कठोर कायद्यांखाली कारवाई करण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे संकेत त्यांनी दिले.

## शहरभर विस्ताराचा महापौरांचा निर्धार

# 'वेस्ट टू आर्ट' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : महानगरपालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक ६, धावडेवस्ती येथे 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' आणि 'माझी वसुंधरा ६.०' अभियानाच्या पार्श्वभूमीवर 'वेस्ट टू आर्ट' या अभिनव उपक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. शहर स्वच्छतेसोबतच पर्यावरणपूरक दृष्टीकोन नागरिकांमध्ये रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या कार्यक्रमाला महापौर रवि लांडगे, नगरसदस्या राजश्री लांडगे, माजी नगरसदस्य राजेंद्र लांडगे, मुख्य आरोग्य निरीक्षक सतीश इंगेवाड, वैभव घोळवे, आरोग्य निरीक्षक राजेंद्र उजिनवाल यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपक्रमाची सुरुवात भोसरीतील कोंडीबा लांडगे मार्ग आणि धावडेवस्ती परिसरात स्वच्छता मोहिम राबवून करण्यात आली. या मोहिमेत संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर 'वेस्ट टू आर्ट' संकल्पनेअंतर्गत टाकाऊ वस्तूंमधून आकर्षक सजावटीच्या वस्तू तयार करून परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले. त्यामुळे 'टाकाऊपासून टिकाऊ' आणि 'कचऱ्यातून कलाकृती' हा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचला.

महापौर रवि लांडगे यांनी यावेळी उपक्रमाची प्रत्यक्ष पाहणी करत नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याचे आणि शहर स्वच्छ राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच परिसरातील आर.आर.आर. सेंटरची पाहणी करून पुनर्वापर आणि पुनर्निर्मितीच्या संकल्पनेला अधिक बळ देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. कार्यक्रमादरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सफाई सेवकांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्याचे कौतुक करत स्वच्छ शहर उभारण्यात सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित नागरिकांनी 'माझी वसुंधरा ६.०' अभियानांतर्गत सामूहिक शपथ घेत पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेचा निर्धार व्यक्त केला.

महापौर रवि लांडगे यांनी 'वेस्ट टू आर्ट' हा उपक्रम शहरातील इतर भागांतही राबविण्याचा मानस व्यक्त केला. स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक पिंपरी-चिंचवड घडवण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

# प्लास्टिक आणि अस्वच्छतेवर महापालिकेची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** सिंगल यूज प्लास्टिकचा वाढता वापर आणि सार्वजनिक ठिकाणी वाढणारी अस्वच्छता रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने कडक कारवाई सुरू केली आहे. वारंवार सूचना देऊनही नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात आरोग्य विभागाच्या पथकाने मोहिम राबवत २१ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील प्रभाग क्रमांक १७ मध्ये सार्वजनिक ठिकाणी बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणारे तसेच अस्वच्छता पसरविणारे नागरिक आणि व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आली.

प्लास्टिकचा वापर, सार्वजनिक ठिकाणी घाण करणे आणि थुंकणे अशा प्रकारांबाबत दंड आकारण्यात आला. त्यात ५ हजार रुपयांचे तीन, २ हजार रुपयांचे एक, १ हजार रुपयांचे चार आणि ५०० रुपयांचे एक प्रकरण समाविष्ट आहे. या सर्व प्रकरणांमधून एकूण २१ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. सहाय्यक आरोग्य अधिकारी सुधीर वाघमारे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य निरीक्षक रुपाली साळवे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### ऑइल सांडल्याने दुचाकी घसरल्या

**पिंपरी :** पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर ऑइल सांडल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आणि एकामागोमाग अनेक दुचाकी घसरून अपघातग्रस्त झाल्याची घटना घडली. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ही घटना लोणी स्टेशन (ता. हवेली) परिसतील हाडके पेट्रोल पंपासमोर बुधवारी रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. अज्ञात वाहनातून मोठ्या प्रमाणात तेल रस्त्यावर सांडल्याने महामार्गाचा एक भाग अक्षरशः घसरडा झाला होता. याची कल्पना नसलेल्या दुचाकीस्वारांचे वाहन अचानक घसरून अनेक जण रस्त्यावर पडले. अपघातांमध्ये काही दुचाकीस्वार किरकोळ जखमी झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र अनेक दुचाकींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही वाहनांचे हेडलाईट, इंडिकेटर आणि बॉडीचे भाग तुटल्याचे दिसून आले. घटनेनंतर काही काळ त्या मार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांना अत्यंत सावधगिरीने प्रवास करावा लागला.

### बारामतीजवळ भीषण अपघात

**भिगवण :** सोलापूर-पुणे महामार्गावर गुरुवारी मध्यरात्री बारामतीजवळ भीषण अपघात घडला. माजी मंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे आणि धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत हे आपल्या सहकाऱ्यांसह फॉर्च्युनर कारने प्रवास करत होते. भिगवणजवळील डाळज २ गावाच्या हद्दीत आल्यानंतर त्यांच्या वाहनाला समोरून येणाऱ्या भरधाव कंटेनरने जोरदार धडक दिली. हा अपघात इतका तीव्र होता की कारच्या चालक बाजूचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. धडकेमुळे कारचे मोठे नुकसान झाले असून गाडीचा पुढील भाग गंभीररीत्या तुटला. मात्र सुदैवाने या अपघातात धनंजय सावंत यांना कोणतीही मोठी दुखापत झाली नाही आणि ते सुखरूप बचावले. धनंजय सावंत हे बुधवारी मुंबईत पार पडलेल्या भाजपच्या पक्षप्रवेश कार्यक्रमानंतर आपल्या परंडा गावी परतत होते. गुरुवारी रात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. कंटेनरचा वेग जास्त असल्यामुळे धडक खूप जोरात बसली, असे सांगण्यात येत आहे.

## धामणी येथे भाविकांची मोठी गर्दी

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर खंडोबाला चंदनउटी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील धामणी येथे हिंदू नववर्षाचा पहिला दिवस आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जाणारा गुढीपाडवा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुढीपाडव्याच्या निमित्ताने येथील पुरातन श्री म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पाडव्याच्या शुभमुहूर्तावर खंडोबाच्या स्वयंभू सप्तशिवलिंगावर चैत्र महिन्यातील पहिली वासंतिक चंदनउटी साकारण्यात आली. या सोहळ्यासाठी शेकडो भाविकांनी हजेरी लावत "सदानंदाचा येळकोट" आणि "जय मल्हार"च्या घोषणांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला.

पहाटे चार वाजता मंदिरात घंटानादाने धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. त्यानंतर पहाटे पाच वाजता सात जोडप्यांच्या हस्ते वसंतपूजा, दुग्धाभिषेक आणि रुद्राभिषेक संपन्न झाला. खंडेराया, म्हाळसाई, बाणाई आणि जोगेश्वरी यांच्या मूर्तींना पाडव्याची साखरगाठी अर्पण करण्यात आली. त्यानंतर देवस्थानाचे सेवेकरी प्रभाकर भगत, दादाभाऊ भगत, सुभाष तांबे, शांताराम भगत, धोंडीबा भगत, नामदेव भगत आणि अनिरुद्ध वाळूंज यांनी स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच पंचधातूच्या खंडोबा, म्हाळसाई आणि बाणाई यांच्या मुखवट्यांवर केशर, दवण्याचे अत्तर आणि चंदनाचा सुगंधी लेप चढवला.

चंदनउटीने सजलेल्या देवतेचे मनमोहक रूप पाहण्यासाठी आणि दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर खंडोबाला द्राक्षांचा हार अर्पण करण्यात आला आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवण्यात आला. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली.

सोहळ्यावेळी मंदिराच्या सभामंडपात टाळ-मृदुंगाच्या साथीने उटीभजन रंगले होते. देवाच्या उटीवरील अभंगांनी वातावरण भक्तिमय झाले होते. तर मंदिर परिसरात पंचरास मंडळीच्या सनईच्या मंगल स्वरांनी धार्मिक वातावरण अधिकच प्रसन्न झाले.

वसंत ऋतूतील उष्णतेचा विचार करून मंदिराच्या गाभाऱ्यात आणि सभामंडपात झेंडू, गुलाब आणि इतर फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. पोंदेवाडीचे बाळशिराम साळगट यांनी फुलसजावट केली, तर धामणीचे युवराज बढेकर यांनी विद्युत रोषणाईची व्यवस्था केली होती. मंदिर परिसरात महेश्वरी आळेकर यांनी काढलेल्या रांगोळ्यांनीही भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

गुढीपाडव्याच्या निमित्ताने पुणे, नगर, नाशिक, मुंबई, भोसरी आणि पिंपरी-चिंचवड परिसरातूनही अनेक भाविक धामणीत दाखल झाले होते. मंदिराबाहेर तळीभंडार, फुले, पेढे यांची दुकाने लागली होती. दुपारनंतरही भाविकांची ये-जा सुरूच होती.

दरम्यान, गुढीपाडव्याच्या निमित्ताने गावात घरोघरी गुढ्या उभारण्यात आल्या. महिलांनी पहाटेपासून अंगणात सडा टाकून रांगोळ्या काढल्या. सकाळी उगवत्या सूर्याच्या साक्षीने पारंपरिक पद्धतीने गुढ्या उभारून कुटुंबीयांनी त्यांची मनोभावे पूजा केली. धामणीतील महादेव मंदिराच्या ओट्यावर नववर्षाच्या पंचांगाचे विधिवत पूजन आणि वाचन करण्यात आले. वर्षभरातील पाऊस, पीकपाणी, धान्य उत्पादन आणि हवामानाविषयीच्या पंचांगातील भाकितांचे वाचन ऐकण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली.

## जुन्नर तालुक्यात अवकाळीच्या शक्यतेने शेतकरी चिंतेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** जुन्नर तालुक्यात सध्या कांदा व गहू काढणीचा हंगाम जोरात सुरू असतानाच ढगाळ वातावरण आणि अवकाळी पावसाच्या शक्यतेमुळे शेतकरी मोठ्या चिंतेत सापडले आहेत. काढणीच्या टप्प्यावर पाऊस झाल्यास कांदा व गहू दोन्ही पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

ओतूर, धोलवड, कुमशेत, शिरोली, तेजेवाडी, ओझर, पिंपळवंडी, आळे, राजुरी, बेल्हे आदी भागात मोठ्या प्रमाणावर कांद्याची लागवड झाली असून, सध्या काढणी व वाळवणीचे काम सुरू आहे. त्याचवेळी तालुक्यातील अनेक ठिकाणी गहू कापणीही अंतिम टप्प्यात आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून आकाशात ढग दाटून येत असून, मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज व्यक्त होत आहे.

अचानक पाऊस झाल्यास शेतात काढलेला कांदा भिजून सडण्याची शक्यता आहे, तर कापलेला गहू ओला होऊन त्याची गुणवत्ता घसरण्याचा धोका आहे. उभ्या पिकालाही मोठा फटका बसू शकतो. आधीच बाजारात अपेक्षित दर मिळत नसल्याने आणि मजुरी खर्च वाढल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. यंदा उत्पादन चांगले आहे, पण काढणीच्या वेळी ढगाळ वातावरणामुळे चिंता वाढली आहे. दर नाही, मजुरी वाढली आहे; पावसामुळे कांदा भिजला तर मोठे नुकसान होईल, असे शेतकरा बांधव म्हणत आहेत.

दरम्यान, हवामान खात्याच्या इशाऱ्यामुळे शेतकरी शक्य तितक्या लवकर पिकांची काढणी करून सुरक्षित साठवणुकीकडे वळले आहेत. मात्र, अवकाळी पावसाचे संकट कायम असल्याने संपूर्ण तालुक्यात चिंतेचे वातावरण आहे.

## पाच वर्षांच्या आरुष खुडेची सर्वत्र चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी गावातील अवघ्या पाच वर्षांचा आरुष मयूर खुडे आपल्या तालबद्ध ताशा वादनामुळे सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. लहान वयातच ताशा योग्य तालात आणि आत्मविश्वासाने वाजवण्याच्या त्याच्या कौशल्याचे गावकऱ्यांकडून कौतुक होत आहे.

रांजणी गावात पारंपरिक वाद्य वादनाची परंपरा खुडे कुटुंबात अनेक पिढ्यांपासून जोपासली जात आहे. गावातील ज्येष्ठ सनई वादक म्हणून विठ्ठल खुडे यांचे नाव परिचित होते. त्यानंतर त्यांचे पुत्र गोपीनाथ खुडे यांनी ही परंपरा पुढे चालवली. पुढे दिलीप खुडे यांनीही ढोल-ताशा सारखी पारंपारिक वाद्ये उत्तम प्रकारे वाजवत ही परंपरा जोपासली. सध्या मयूर खुडे हे डफ वादनाच्या माध्यमातून ही परंपरा पुढे नेत आहेत.

या पारंपारिक कलेचा वारसा आता अवघ्या पाच वर्षांच्या आरुषकडे पोहोचला आहे. सध्या तो अंगणवाडीत शिक्षण घेत असला तरी साडेतीन-चार वर्षांचा असतानाच त्याला ताशा वादनाची आवड निर्माण झाली. वडील मयूर, आजोबा दिलीप आणि पंजोबा गोपीनाथ यांच्याकडून त्याला घरच्या घरीच पारंपारिक वाद्यांचे धडे दिले जात आहेत.

लहान वय असूनही आरुष योग्य तालात ताशा वाजवत असल्याने गावातील विविध कार्यक्रमांमध्ये त्याला संधी दिली जाते. त्याच्या वादनाने उपस्थितांकडून टाळ्यांचा कडकडाट होत असून अनेक जण त्याचे कौतुक करत आहेत. पारंपारिक वाद्यांची ही समृद्ध परंपरा पुढे नेणारा हा चिमुकला कलाकार भविष्यात मोठे यश संपादन करेल, असा विश्वास ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. त्यामुळे रांजणी गावात सध्या आरुष खुडे हा चर्चेचा विषय ठरत आहे.

## तावशी येथे नीरेवरील पुलाच्या कामास सुरुवात

### पुणे आणि सातारा जिल्ह्यांना जोडणारा १८ कोटी रुपयांचा प्रकल्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर :** पुणे आणि सातारा जिल्ह्यांना जोडणाऱ्या सुमारे १८ कोटी रुपयांच्या पुलाच्या कामास इंदापूर तालुक्यातील तावशी येथे नीरा नदीवर सुरुवात झाली आहे. या पुलामुळे दोन्ही जिल्ह्यांतील ग्रामस्थांच्या दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या विशेष प्रयत्नांतून तावशी येथील नीरा नदीवरील पुलासाठी सुमारे १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या कामासाठी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिन सपकळ यांनी पाठपुरावा केला होता.

गेल्या अनेक वर्षांपासून तावशी येथील नीरा नदीवर सातारा जिल्ह्यातील आसू आणि पुणे जिल्ह्यातील तावशी गावांना जोडणारा अरुंद व कठडे नसलेला पूल होता. या पुलावरून ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत होती. पुलावरून पडून अनेक अपघातही झाले होते. त्यामुळे या ठिकाणी दुहेरी वाहतुकीसाठी सक्षम आणि सुरक्षित पूल उभारण्याची ग्रामस्थांची अनेक वर्षांची मागणी होती.

ही मागणी लक्षात घेऊन दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुलासाठी निधी मंजूर करून दिला. सध्या या ठिकाणी नीरा नदीवर सुमारे आठशे मीटर लांबीच्या पुलाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

बारामती हे शेतीमालाच्या खरेदी-विक्रीचे मोठे केंद्र असल्याने सातारा जिल्ह्यातील आसू परिसरातील शेतकऱ्यांना शेतीमाल विक्रीसाठी बारामतीकडे येणे अधिक सोयीचे होणार आहे. तसेच, या परिसरात मोठ्या प्रमाणात ऊस उत्पादन होत असल्याने श्री छत्रपती कारखान्याकडे गाळपासाठी ऊस वाहतूक करण्यासही या पुलाचा मोठा फायदा होणार आहे. गेल्या सहा महिन्यांपासून पुलाच्या कामाला गती मिळाली असून हे काम लवकर पूर्ण व्हावे, यासाठी मंजूर निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## पिढीजात व्यवसाय जपणारे भांडेकर पिता-पुत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी-धामणी परिसरात सध्या पिशोर, ता. कन्नड, जि. संभाजीनगर येथील अशोक लक्ष्मण भांडेकर आणि त्यांचे पुत्र सचिन अशोक भांडेकर हे दारोदारी फिरून आपल्या पिढीजात व्यवसायातून उदरनिर्वाह करताना दिसत आहेत. "जाते, पाटा, वरवंटा लावायचा का?" अशी हाळी देत हे पिता-पुत्र गावोगावी फिरतात आणि घरगुती वापरातील पारंपरिक दगडी साधनांना पुन्हा वापरायोग्य बनवण्याचे काम करतात.

आजही ग्रामीण भागात विशिष्ट सण-समारंभ, पारंपरिक पदार्थांची तयारी किंवा घरगुती वापरासाठी जाते, पाटा आणि वरवंट्याचा वापर केला जातो. त्यामुळे ही साधने धारदार आणि समतल ठेवण्यासाठी त्यांना पुन्हा लावून घेण्याची गरज भासते. भांडेकर पिता-पुत्र लोखंडी छन्नीच्या साहाय्याने जाते, पाटा आणि वरवंट्याच्या पृष्ठभागावर योग्य प्रकारे घडाई करून ते वापरासाठी योग्य बनवतात.

याबाबत त्यांनी सांगितले की, सध्या ते पत्नी आणि मुलासह शिरूर तालुक्यातील केंदूर येथे वास्तव्यास आहेत. तेथून केंदूर, पाबळ, कान्हूर मेसाई, शिक्रापूर परिसरासह आंबेगाव तालुक्यातील लोणी-धामणी भागात फिरून काम मिळते का, याचा शोध घेत आहेत. साधारण फेब्रुवारी ते एप्रिल या तीन महिन्यांच्या काळात ते या भागात वास्तव्यास राहून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दर दोन-तीन वर्षांनी ते या परिसरात येतात.

अशोक भांडेकर म्हणाले की, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील ग्रामीण भागातही जाऊन ते हेच काम करतात. हा त्यांचा पिढीजात व्यवसाय असून ते जातीवडार समाजातील आहेत. कुटुंबात आई, पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी आहे. वर्षातील चार ते पाच महिने त्यांना घराबाहेर राहून काम करावे लागते.

ते जाते, पाटा आणि वरवंटा तयार करून विक्रीही करतात. एका जातेची किंमत अंदाजे १५०० ते २००० रुपये, तर पाटा-वरवंट्याची किंमत १००० ते १५०० रुपये इतकी असते. पारंपरिक साधनांचा वापर कमी होत असला, तरी ग्रामीण भागात अजूनही या वस्तूंना मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

अशोक भांडेकर यांनी आपल्या समाजाच्या परंपरांबाबतही माहिती दिली. ते म्हणाले, "आम्ही जातीवडार समाजाचे असलो, तरी पंढरपूर येथे आषाढी एकादशीला आणि आळंदी येथे कार्तिकी एकादशीला कैकाडी महाराजांच्या धर्मशाळेतील रथ ओढण्याचा आम्हाला मान आहे."

शेती नसल्याने हातावरचे पोट असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. शासनाकडून कोणत्याही विशेष सवलती मिळत नसल्याचे सांगताना, अशा पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

## वळतीत गुढीपाडव्यानिमित्त पंचांग वाचन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** गुढीपाडव्यानिमित्त आंबेगाव तालुक्यातील वळती गावात पंचांग वाचनाची परंपरा यंदाही उत्साहात आणि श्रद्धाभावाने पार पडली. गावातील विठ्ठल-रखुमाई मंदिरात आयोजित या पारंपरिक कार्यक्रमाला शेतकरी आणि ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभली. वर्षभरातील पाऊसमान, शेती, धनधान्य, रोगराई, लोकजीवन आणि सुखसमृद्धीविषयीचे भाकीत ऐकण्यासाठी ग्रामस्थांनी गर्दी केली होती.

यंदा मेघनिवास माळ्याच्या घरी असून रोहिणी नक्षत्र समुद्रावर पडले असल्याने यावर्षी भरपूर पाऊस होईल आणि धनधान्याचे उत्पादन वाढेल, असे पंचांगातून भाकीत वर्तविण्यात आले. तसेच यंदा पर्जन्यमान मध्यम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असली, तरी त्यातील मोठा भाग नद्या, पर्वत आणि भूमीवर इंद्रवर्षावाच्या स्वरूपात पडेल, असेही सांगण्यात आले.

पंचांगातील अंदाजानुसार, यंदा खरिपाचा स्वामी गुरु असल्याने पाऊस चांगला पडेल. त्यामुळे धान्य, फळे आणि इतर पिकांचे उत्पादन समाधानकारक होईल. संपत्ती वाढेल आणि लोकांमध्ये आनंदाचे वातावरण राहील, असे भाकीत करण्यात आले. त्याचबरोबर रब्बीचा स्वामी बुध असल्याने गहू, मूग, ऊस, भात तसेच दूध-दुभत्याचे उत्पादनही मुबलक होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. विद्वानांना गौरव प्राप्त होईल, असेही यावेळी नमूद करण्यात आले. यंदा राजा गुरु असल्याने पावसाचे प्रमाण समाधानकारक राहील आणि धान्य, फळे व दूध यांची उपलब्धता चांगली राहील, असेही पंचांगात सांगण्यात आले. मात्र, मंत्री मंगळ असल्याने काही विरोधाभासी परिस्थितीही निर्माण होऊ शकते, असा इशारा देण्यात आला.

या कार्यक्रमापूर्वी गावातील ग्रामदैवतांची विधिवत पूजा करून आढागढ्या उभारण्यात आल्या. त्यानंतर पंचांग पूजनाचा कार्यक्रम झाला. वळतीचे पोलीस पाटील प्रकाश लोंढे यांच्या हस्ते पंचांग पूजन करण्यात आले. पौराहित्य बाळकृष्ण नथू बेलेकर यांनी केले. यावेळी सरपंच आनंद वाव्हळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पंचांग वाचनाची परंपरा शेतीप्रधान संस्कृतीचा महत्त्वाचा भाग म्हणून जपली जात आहे.

## भाविकांच्या खिशाला कात्री, सुविधांचा प्रश्न ऐरणीवर

# खंडोबाच्या जेजुरीत वाहन प्रवेशकराचा उच्चांकी ठेका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जेजुरी :** जेजुरी नगरपरिषदेने सन २०२६-२७ या कालावधीसाठी भाविकांच्या वाहनांकडून वसूल होणाऱ्या वाहन प्रवेशकराचा ठेका जाहीर लिलावातून तब्बल ३ कोटी ३४ हजार रुपयांना दिला आहे. गेल्या काही वर्षांतील ही सर्वाधिक रक्कम मानली जात असून, संबंधित ठेकेदाराने संपूर्ण रक्कम भरल्यानंतरच अधिकृत पत्र देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्राचे कुलदैवत खंडेरायाच्या दर्शनासाठी, कुलधर्म-कुलाचारांसाठी आणि विविध धार्मिक विधींसाठी वर्षभरात दीड कोटींहून अधिक भाविक जेजुरीत येतात. जेजुरीचे अर्थकारण आणि समाजकारण मोठ्या प्रमाणावर या भाविकांवर अवलंबून आहे. बहुजन, कष्टकरी, शेतकरी आणि सर्वसामान्यांचा खंडोबा लोकदेव असला, तरी प्रत्यक्षात देवदर्शन मात्र दिवसेंदिवस महाग होत चालल्याची भावना भाविकांमध्ये व्यक्त होत आहे.

पूर्वी बैलगाडी, एसटी किंवा रेल्वेने जेजुरीत पोहोचणारे भाविक आता मोठ्या प्रमाणात खासगी चारचाकी वाहनांनी येत आहेत. याच पार्श्वभूमीवर गेल्या काही वर्षांपासून वाहन प्रवेशकराची वसुली सुरू आहे. सुरुवातीला २० ते ३० रुपयांदरम्यान असलेला हा कर आता ६० ते ८० रुपयांवर स्थिरावला आहे. मात्र, हा कर भरूनही भाविकांना सुसज्ज वाहनतळ, स्वच्छतागृहे किंवा इतर मूलभूत सुविधा मिळत नसल्याची तक्रार आहे.

वाहन प्रवेशकर वेगळा, खाजगी पार्किंगचे शुल्क वेगळे, गडावर गर्दी असल्यास दर्शन पाससाठी वेगळे पैसे, त्यात पूजा-अभिषेक, तळीभंडार, दान-दक्षिणा आणि राष्ट्रीय महामार्गावरील टोल अशी खर्चाची मालिका भाविकांना झेलावी लागत आहे. त्यामुळे कुलदैवताचे दर्शन सर्वसामान्यांसाठी परवडणारे राहिले नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, नगरपरिषदेकडून प्रवेशकराची वसुली वर्षानुवर्षे होत असतानाही त्याच्या बदल्यात कोणत्याही ठोस सुविधा उभ्या राहिलेल्या दिसत नाहीत. नगरपरिषदेचा स्वतःचा वाहनतळ नाही. बहुतांश खाजगी पार्किंग ठिकाणी स्वच्छतागृहांचाही अभाव आहे. त्यामुळे "कर आकारला जातो, पण सुविधा कुठे आहेत?" हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.

जेजुरी शहरात प्रवेश करताना आठ प्रमुख मार्गांवर वाहन प्रवेशकर वसूल केला जातो. मात्र, 'महाराष्ट्र शासन' किंवा 'पोलीस' अशा पाट्या असलेल्या वाहनांना, तसेच काही अधिकारी, लोकप्रतिनिधी, नेते आणि त्यांच्या नातेवाईकांना या करातून सूट मिळत असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कराचा फटका सर्वसामान्य मध्यमवर्गीय भाविकांनाच बसत असल्याची भावना आहे.

दरम्यान, इतर तीर्थक्षेत्रांच्या तुलनेत जेजुरीतील परिस्थिती अधिक विसंगत असल्याचेही बोलले जात आहे. आळंदीत वाहन प्रवेशकर नसून वाहनतळ वापरल्यासच शुल्क आकारले जाते. त्र्यंबकेश्वर येथेही काही महिन्यांपूर्वी वाहन प्रवेशकर बंद करण्यात आल्याची माहिती स्थानिक विश्वस्तांकडून देण्यात आली आहे. तुळजापूरमध्येही अशीच स्थिती असल्याचे सांगितले जाते. याउलट जेजुरीत ना पुरेशा सुविधा, ना प्रशस्त वाहनतळ; तरीही प्रवेशकर कायम आहे.

## शेतकरी आर्थिक संकटात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील वाल्हे परिसरात यंदा मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड झाली असून, काढणी अंतिम टप्प्यात आहे. मात्र, दर कोसळल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर नैराश्याची वेळ आली आहे.

गतवर्षी समाधानकारक पावसामुळे पाण्याची उपलब्धता चांगली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड केली होती. यंदा चांगला दर मिळेल, अशी अपेक्षा होती; मात्र, प्रत्यक्षात दर घसरल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. त्यातच अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर नुकसान होण्याची भीतीही व्यक्त होत आहे.

सध्या कांद्याला ४ ते १२ रुपये प्रतिकिलो दर मिळत असून, उत्पादन खर्चही निघत नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे शेतकरी ऊन व पावसापासून संरक्षणासाठी कांद्याची साठवण करण्याकडे वळले आहेत. यासाठी दगडी, लाकडी व लोखंडी कांदाचाळ उभारण्याचे पर्याय वापरले जात आहेत. मात्र, वाढलेली मजुरी, खते, डिझेल आणि लोखंडाच्या किमतीमुळे साठवणूक करणेही खर्चिक ठरत आहे. जागतिक परिस्थितीचाही बाजारावर परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे तातडीने दरात सुधारणा होण्याची शक्यता कमी असल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणी वाढल्या आहेत. खते, औषधे, मशागत, मजुरी यांसारख्या खर्चात मोठी वाढ झाली आहे, त्यामुळे अडचणी वाढल्या आहेत.

## सारांश वृत्त


### काश्मीरच्या उंच भागात हिमवृष्टी




**श्रीनगर :** गुलमर्ग आणि सोनमर्ग या पर्यटन स्थळांसह काश्मीरच्या उंच भागातील अनेक ठिकाणी नव्याने हिमवृष्टी झाली, तर मैदानी प्रदेशात मुसळधार पावसाचा फटका बसला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली. उत्तर काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील गुलमर्ग आणि मध्य काश्मीरच्या गांदरबल जिल्ह्यातील सोनमर्ग या दोन्ही ठिकाणी नव्याने हिमवृष्टी झाली आहे.

### 'भेसळयुक्त' दुग्धजन्य पदार्थ जप्त

**हैदराबाद :** भेसळयुक्त पनीर आणि इतर दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीत कथितरित्या सहभागी असलेल्या सहा जणांना अटक करण्यात आली असून, सुमारे ३,९०० किलो भेसळयुक्त पदार्थ जप्त करण्यात आले आहेत, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली. हैदराबाद आयुक्तांच्या कृती दलाच्या पथकाने, बृहत्तर हैदराबाद महानगरपालिकेच्या (जीएचएमसी) अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या समन्वयाने, बुधवारी सिकंदराबादमधील महाकाली मंदिरा जवळील गंज बाजार येथे अचानक तपासणी केली.



### झारखंडमध्ये हलक्या पावसाची शक्यता

**रांची :** भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) गुरुवारी २० आणि २१ मार्च रोजी झारखंडच्या काही भागांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे. हवामान खात्याने शुक्रवारी मेघगर्जनेसह पावसासाठी 'ऑरेंज' अलर्ट (तयार रहा) जारी केला आहे. आयएमडीने सांगितले की, शुक्रवारी राज्याच्या ईशान्य आणि मध्य भागातील काही जिल्ह्यांमध्ये ताशी ६०-७० किमी वेगाने वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस, मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि गारपिटीची शक्यता आहे.

## ऊर्जा पायाभूत सुविधांवर हल्ल्यांमुळे खळबळ

# मध्य पूर्वेत तणाव शिगेला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली/तेहरान :** पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती आणखी तीव्र झाली असून इराणमधील वरिष्ठ नेतृत्वावर झालेल्या लक्ष्यित हल्ल्यांनंतर तणाव शिगेला पोहोचला आहे. इराणच्या सुरक्षा यंत्रणेतील महत्त्वाचे नेते अली लारीजानी आणि गुप्तचर मंत्री एस्माईल खातीब यांच्या हत्येनंतर तेहरानकडून कठोर प्रतिशोधाचे संकेत देण्यात आले आहेत. दरम्यान, ऊर्जा पायाभूत सुविधांवर झालेल्या हल्ल्यांमुळे संपूर्ण आखात परिसरात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

उपलब्ध माहितीनुसार, इस्रायलने इराणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना लक्ष्य करण्याची मोहीम सुरूच ठेवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. अली लारीजानी यांच्या हत्येनंतर लगेचच इराणचे गुप्तचर मंत्री एस्माईल खातीबही ठार झाल्याचे वृत्त समोर आले. या सलग कारवायांमुळे इराणच्या सत्ताकेंद्रावर थेट दबाव निर्माण झाल्याचे मानले जात आहे.

या घडामोडींनंतर इराणकडून तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. इराणी नेतृत्वाने या हल्ल्यांचा बदला घेतला जाईल, असा स्पष्ट इशारा दिला आहे. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेशकियन यांनी ऊर्जा प्रकल्पांवर झालेले हल्ले हा धोकादायक टप्पा असल्याचे सांगत त्याचा निषेध नोंदवला. या संघर्षाचे परिणाम केवळ इराण-इस्रायलपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर संपूर्ण प्रदेशावर त्याची झळ बसू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

संघर्षाचा सर्वाधिक गंभीर परिणाम ऊर्जा क्षेत्रावर दिसून येत आहे. इस्रायलकडून इराणच्या दक्षिण पार्स वायूक्षेत्रावर हल्ला झाल्याचे वृत्त आहे. त्यानंतर इराणने कतार, संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबियातील ऊर्जा सुविधांवर क्षेपणास्त्र हल्ले केल्याची माहिती समोर आली. या हल्ल्यांमुळे काही ठिकाणी आग लागली, उत्पादन विस्कळीत झाले आणि जागतिक ऊर्जा पुरवठ्याबाबतची चिंता वाढली. या पार्श्वभूमीवर तेलाच्या किमतींमध्ये मोठी उसळी नोंदवली गेली आहे. होर्मूज सामुद्रधुनीवरील तणाव, आखाती देशांतील ऊर्जा सुविधांवरचे हल्ले आणि युद्धाचा वाढता व्याप यामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता वाढली आहे. जहाजवाहतूक, इंधनपुरवठा आणि प्रादेशिक सुरक्षेवर त्याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, या संघर्षाचा मानवी आणि राजनैतिक परिणामही मोठा आहे. इराण, इस्रायल, लेबनॉन आणि आखातातील इतर भागांमध्ये हल्ले, भीती आणि अनिश्चितता यांचे सावट अधिक गडद झाले आहे. पश्चिम आशियातील हा संघर्ष आता केवळ सीमित लष्करी कारवाई न राहता ऊर्जा, अर्थकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंधांना हादरा देणाऱ्या व्यापक संकटात रूपांतरित होत असल्याचे चित्र दिसत आहे.

## इराणच्या हल्ल्यांनंतर ऊर्जा बाजार हादरला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बँकॉक :** इराणने कतारमधील महत्त्वाच्या नैसर्गिक वायू प्रकल्पावर आणि कुवेतमधील दोन तेल शुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ला केल्यानंतर गुरुवारी जागतिक ऊर्जा बाजारात मोठी खळबळ उडाली. या घडामोडींनंतर कच्च्या तेलाच्या आणि नैसर्गिक वायूच्या किमतींनी झपाट्याने उसळी घेतली असून, जागतिक अर्थव्यवस्थेवर नव्या दबावाची चिन्हे दिसू लागली आहेत.

हल्ल्यांमुळे आधीच तणावाखाली असलेल्या ऊर्जा पुरवठा साखळीवर अधिक आघात झाला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी टँकर वाहतुकीसाठी बंद झाल्याने निर्माण झालेले संकट आता अधिक काळ टिकू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. परिणामी तेल आणि वायू उत्पादनात दीर्घकालीन अडथळे निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातील प्रमुख निर्देशक असलेल्या ब्रेंट क्रूडची किंमत युद्धापूर्वी प्रति बॅरल ७३ डॉलरच्या खाली होती. मात्र, ताज्या हल्ल्यांनंतर ती थेट ११४ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचली. युरोपियन बाजारातील नैसर्गिक वायूचा प्रमुख निर्देशांक टीटीएफमध्येही मोठी वाढ झाली असून, त्यात २४ टक्क्यांची उसळी नोंदवली गेली.

इराणने कतारमधील रास लाफान एलएनजी टर्मिनलवर ड्रोन हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. ही सुविधा द्रवीकृत नैसर्गिक वायूच्या जागतिक पुरवठ्यात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. जहाजाद्वारे निर्यात होणाऱ्या जगातील सुमारे २० टक्के एलएनजीचा पुरवठा कतारकडून केला जातो. हल्ल्यानंतर ही सुविधा बंद करण्यात आली. त्यातच होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्याने एलएनजी वाहतुकीचा मार्गही ठप्प झाला आहे.

ऊर्जा दरातील वाढीचा परिणाम वित्तीय बाजारावरही तातडीने दिसून आला. तेलाचे दर पुन्हा भडकताच वॉल स्ट्रीटवरील शेअर बाजार घसरला, आणि त्यानंतर आशिया व युरोपमधील बाजारातही दबाव निर्माण झाला. गुंतवणूकदारांमध्ये महागाईबाबतची चिंता पुन्हा तीव्र झाली आहे.

## यसम्राट चौधरी उत्तराधिकारी नाहीत...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाटणा :** मुख्यमंत्री नितीश कुमार लवकरच पायउतार होऊन राज्यसभेत जाणार आणि त्यानंतर सम्राट चौधरी यांना उत्तराधिकारी म्हणून पुढे केले जात आहे, अशा चर्चांना बिहार सरकारमधील मंत्री विजय कुमार चौधरी यांनी स्पष्ट शब्दांत फेटाळून लावले आहे.

जमुई जिल्ह्यातील समृद्धी यात्रादरम्यान बुधवारी नितीश कुमार यांनी उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्याकडे निर्देश करत, "ते बिहारची जबाबदारी सांभाळतील आणि राज्य मोठी प्रगती करेल," असे वक्तव्य केले होते. त्यानंतर राजकीय वर्तुळात आणि प्रसारमाध्यमांमध्ये विविध तर्कवितर्कांना उधाण आले होते. या विधानाचा अर्थ सम्राट चौधरी यांना पुढील मुख्यमंत्री म्हणून पुढे केले जात असल्याचा लावला जात असताना, जेडी(यू)चे ज्येष्ठ नेते विजय कुमार चौधरी यांनी तो दावा सरळ नाकारला. "मी त्या ठिकाणी उपस्थित होतो. त्यामुळे माझ्यासमोर कृपया तुमचे अर्थ लावू नका," असे ते म्हणाले. मात्र, त्यांनी सम्राट चौधरी यांच्या कामकाजाचे कौतुक केले. उपमुख्यमंत्री म्हणून ते मुख्यमंत्र्यांसोबत प्रामाणिकपणे काम करत असून, नितीश कुमार आपल्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा स्वरूपाची विधाने नेहमीच करत असतात, असे त्यांनी स्पष्ट केले. "यात काहीही नवीन नाही. तुम्ही लोक त्यातून वेगळा अर्थ काढत आहात," असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, जेडी(यू) अध्यक्षांच्या सध्याच्या पदावरील अखेरच्या इफ्तार मेजवानीनंतर सम्राट चौधरी यांनीही मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधला. नितीश कुमार यांनी नेहमीच अल्पसंख्याकांची काळजी घेतली असून, रमजान महिन्यात मुस्लिम समाजातील लोकांना घरी आमंत्रित करण्याची त्यांची परंपरा असल्याचे त्यांनी सांगितले.

## धर्म स्वातंत्र्य विधेयकावर छत्तीसगडमध्ये खडाजंगी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रायपूर :** 'छत्तीसगड धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६' सभागृहात सादर होताच गुरुवारी विधानसभेत सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले. विधेयक मांडल्यानंतर त्यावरून जोरदार राजकीय संघर्ष पेटला असून, पुढील काही दिवस राज्यातील वातावरण आणखी तापण्याची चिन्हे आहेत.

गृहखाते सांभाळणारे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी हे विधेयक सभागृहात सादर केले. या विधेयकावर पुढील टप्प्यात सविस्तर चर्चा होणार आहे. भाजप सरकारने धर्मांतरविरोधी विद्यमान कायद्यांना अधिक कडक आणि व्यापक स्वरूप देण्यासाठी हे पाऊल उचलले आहे.

सरकारच्या मते, सक्ती, आमिष, अवाजवी प्रभाव किंवा खोटे प्रतिनिधित्व यांद्वारे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात होणाऱ्या धर्मांतराला आळा घालण्यासाठी सुधारित कायदेशीर चौकट आवश्यक आहे. गेल्या आठवड्यात राज्य मंत्रिमंडळाने या प्रस्तावित विधेयकाला मंजुरी दिली होती.

पत्रकारांशी बोलताना विजय शर्मा यांनी सांगितले की, १९६८ पासून अस्तित्वात असलेल्या तरतुदींना नव्या स्वरूपात विस्तार देण्याचे काम या विधेयकातून करण्यात आले आहे. आमिष दाखवण्याचे प्रकार आता केवळ पारंपरिक मार्गांपुरते मर्यादित नसून डिजिटल आणि आर्थिक माध्यमांतूनही ते दिले जाऊ शकतात, असे त्यांनी नमूद केले. तसेच धमक्या या प्रत्यक्ष शारीरिक स्वरूपाच्या असू शकतात, किंवा अप्रत्यक्ष दबावाच्या माध्यमातूनही दिल्या जाऊ शकतात, असेही ते म्हणाले. "घटनात्मक स्वातंत्र्यावर गदा येणार नाही, आणि त्याचवेळी सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या परिस्थितींना प्रतिबंध बसेल, अशी सुव्यवस्थित कायदेशीर चौकट तयार करण्यात आली आहे," असे शर्मा यांनी स्पष्ट केले. मात्र, विरोधकांनी या विधेयकाला तीव्र आक्षेप घेतला. विरोधी पक्षनेते चरणदास महंत यांनी सभागृहात पुढाकार घेत विधेयकावर तातडीने चर्चा करण्यास विरोध दर्शवला. देशातील इतर अकरा राज्यांतील अशाच प्रकारचे कायदे विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित असल्याने, या विधेयकावर थेट चर्चा करणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी सांगितले.

महंत यांनी या विधेयकाची कायदेशीर संवेदनशीलता अधोरेखित करत, ते आधी विधानसभेच्या निवड समितीकडे पाठवावे, अशी मागणी केली. कोणतेही पुढील पाऊल उचलण्यापूर्वी या प्रस्तावाची सर्वंकष आणि सखोल छाननी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.

## चीनमध्ये भारताचे नवे राजदूत विक्रम दोराईस्वामी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत-चीन संबंध नव्याने स्थिर करण्याच्या प्रयत्नांना वेग येत असतानाच, अनुभवी मुत्सद्दी विक्रम दोराईस्वामी यांची चीनमधील भारताचे नवे राजदूत म्हणून गुरुवारी नियुक्ती करण्यात आली. पूर्व लडाखमधील चार वर्षांहून अधिक काळ चाललेल्या लष्करी तणावानंतर दोन्ही देश संबंध पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न करत असताना ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.

१९९२ बॅचचे भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी असलेले दोराईस्वामी सध्या युनायटेड किंगडममध्ये भारताचे उच्चायुक्त म्हणून कार्यरत आहेत. ते चीनमधील विद्यमान भारतीय राजदूत प्रदीप कुमार रावत यांची जागा घेणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, दोराईस्वामी लवकरच नवी जबाबदारी स्वीकारतील. २०२० मध्ये गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर भारत-चीन संबंध तणावाच्या अत्यंत खालच्या टप्प्यावर गेले होते. त्यानंतर गेल्या काही महिन्यांत दोन्ही देशांनी संवाद वाढवून संबंध स्थिर करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. ऑक्टोबर २०२४ मध्ये सीमावादाशी संबंधित लष्करी संघर्ष संपुष्टात आल्याचे मानले जाते. या पार्श्वभूमीवर चीनमध्ये नवा आणि अनुभवी चेहरा पाठवण्याचा निर्णय धोरणात्मक मानला जात आहे.

दिल्ली विद्यापीठातून इतिहास विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या दोराईस्वामी यांनी परराष्ट्र सेवेत येण्यापूर्वी पत्रकारिताही केली होती. प्रशिक्षणानंतर त्यांची हाँगकाँग येथे तृतीय सचिव म्हणून पहिली नियुक्ती झाली. त्यानंतर सप्टेंबर १९९६ मध्ये त्यांची बीजिंग येथे चार वर्षांसाठी नियुक्ती झाली होती. दोराईस्वामी यांनी परराष्ट्र मंत्रालयात उप प्रोटोकॉल प्रमुख, तसेच नंतर पंतप्रधानांचे खाजगी सचिव म्हणूनही काम पाहिले आहे.

## सरकारची सावध भूमिका समजू शकते : शशी थरूर

# संघर्षावर भारताने पुढाकार घ्यावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात वाढलेल्या संघर्षावर भारत सरकारने सावध भूमिका घेतल्याचे समजू शकते, मात्र हे युद्ध लवकर थांबावे यासाठी भारताने पुढाकार घेत दोन्ही बाजूंना सार्वजनिक आवाहन करावे, अशी अपेक्षा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी गुरुवारी व्यक्त केली.

माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत थरूर यांनी सांगितले की, सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीत संघर्षात थेट सहभागी नसलेल्या देशांचा एक गट पुढे येऊन दोन्ही बाजूंना शांततेचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करू शकतो. या प्रयत्नात भारताने महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर भारत सरकारने तातडीने शोक व्यक्त करायला हवे होते, असे मतही थरूर यांनी मांडले. २०२४ मध्ये हेलिकॉप्टर अपघातात तत्कालीन इराणी राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रईसी यांचे निधन झाले होते, त्यावेळी भारताने ज्या पद्धतीने त्वरित शोक व्यक्त केला आणि राष्ट्रीय शोक जाहीर केला, त्याच धर्तीवर आताही प्रतिक्रिया द्यायला हवी होती, असे त्यांनी नमूद केले.

खामेनी यांच्या हत्येचा भारताने निषेध करायला हवा होता का, असा प्रश्न विचारल्यावर थरूर यांनी थेट निषेधाचा आग्रह धरला नाही. मात्र, भारताने किमान शोक व्यक्त करणे अपेक्षित होते, असे त्यांनी म्हटले. मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या देशाच्या आध्यात्मिक नेत्याच्या निधनावर संवेदना व्यक्त करणे ही सौजन्याची बाब असल्याचे ते म्हणाले. इराणी दूतावासाने शोकपुस्तिका उघडल्यानंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी तेथे जाऊन स्वाक्षरी केली, ही चांगली बाब असल्याचे थरूर यांनी नमूद केले. तरीही, भारताने यापेक्षा अधिक स्पष्ट आणि तातडीची भूमिका घ्यायला हवी होती, असे त्यांचे मत होते. याचवेळी त्यांनी सरकारच्या सावध भूमिकेचे कारणही अधोरेखित केले. आखाती प्रदेशाशी भारताचे व्यापक हितसंबंध जोडलेले असल्याने सरकारने अत्यंत तोलूनमापून पावले टाकण्याचा प्रयत्न केला असावा, असे ते म्हणाले. थरूर यांनी सांगितले की, भारताची ऊर्जा सुरक्षा मोठ्या प्रमाणावर आखाती प्रदेशावर अवलंबून आहे. एलपीजी आणि एलएनजी आयात, आखाती देशांतील ९० लाख भारतीय नागरिक, त्यांच्याकडून येणारी आर्थिक पाठवणी, तसेच संयुक्त अरब अमिरात आणि सौदी अरेबियासारख्या देशांकडून होणारी गुंतवणूक, हे सर्व भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे मध्य-पूर्व आणि पश्चिम आशियात शांतता व स्थैर्य राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या संघर्षाचे परिणाम भारतातील सामान्य नागरिकांवरही उमटू लागल्याचा दावा थरूर यांनी केला. गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे काही ठिकाणी ढाबे बंद पडत असल्याचे, तर हैदराबादमध्ये मंद आचेवर शिजणारा हलीम बनवण्यात अडचणी येत असल्याचे त्यांनी उदाहरणादाखल सांगितले.

## स्वेच्छेने घर सोडले असल्यास 'हेबिअस कॉर्पस' नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मदुराई :** पत्नीने स्वतःच्या इच्छेने सासरचे घर सोडले असेल आणि ती दुसऱ्या व्यक्तीसोबत निघून गेली असेल, तर तिला परत आणण्यासाठी 'हेबिअस कॉर्पस' याचिकेचा वापर करता येत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने नोंदवले. अशा परिस्थितीत संबंधित महिलेला बेकायदेशीररीत्या कैद करून ठेवले आहे, असे गृहीत धरता येत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

मात्र, या प्रकरणात महिलेसोबत गेलेल्या दोन लहान मुलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा अधिक गंभीर असल्याचे नमूद करत न्यायालयाने पोलिसांना संबंधित महिलेचा आणि मुलांचा शोध घेऊन त्यांना न्यायाधीशांसमोर हजर करण्याचे आदेश दिले आहेत. हे प्रकरण न्यायमूर्ती एन. आनंद व्यंकटेश आणि न्यायमूर्ती पी. धनबल यांच्या खंडपीठासमोर आले. याचिकाकर्त्या पतीने दावा केला होता की, ६ मार्च २०२६पासून त्याची पत्नी आणि दोन मुले बेपत्ता आहेत. पोलिसांत तक्रार करूनही ठोस कारवाई होत नसल्याने त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या तक्रारीनंतर ७ मार्च २०२६ रोजी 'महिला बेपत्ता' अशी एफआयआर नोंदवण्यात आली होती. सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, संबंधित महिलेचे दुसऱ्या एका पुरुषाशी प्रेमसंबंध निर्माण झाले होते आणि ती स्वतःच्या इच्छेने आपल्या दोन्ही मुलांना घेऊन त्याच्यासोबत निघून गेली आहे. सरकारी पक्षाचा हा युक्तिवाद लक्षात घेत खंडपीठाने स्पष्ट शब्दांत नमूद केले की, "जर पत्नीने स्वतःच्या मर्जीने घर सोडले असेल, तर 'हेबिअस कॉर्पस' याचिकेत न्यायालयाकडून कोणतेही निर्देश दिले जाऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत याचिकेत करण्यासारखे काही उरत नाही. अर्जदाराने संबंधित न्यायालयात कायदेशीर मार्गाने दाद मागावी." न्यायालयाने या प्रकरणात मुलांच्या हिताला प्राधान्य दिले. आईसोबत गेलेल्या दोन मुलांची अधिक काळजी वाटत असल्याचे नमूद करत खंडपीठाने पोलिसांना त्या महिलेचा आणि मुलांचा शोध घेण्याचे आदेश दिले. महिला आणि मुले सापडल्यानंतर त्यांना अलंगुलम येथील न्यायिक दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यात यावे, असेही निर्देश न्यायालयाने दिले.

## राष्ट्रपती मुर्मू यांची श्रीराम मंदिराला भेट

**अयोध्या :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी अयोध्येतील राम मंदिराला भेट दिली आणि विशेष धार्मिक सोहळ्याचा भाग म्हणून १५० किलो सोन्याचा मुलामा असलेल्या श्री राम यंत्राची स्थापना करणार आहेत. राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य व ब्रजेश पाठक यांनी मुर्मू यांचे स्वागत केले. वैदिक गणितावर आधारित हे यंत्र सकारात्मक आध्यात्मिक ऊर्जा निर्माण करण्यासाठी तयार केले असून आहे.

## केरळसाठी भाजपची दुसरी उमेदवार यादी जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुवनंतपुरम :** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली असून, पक्षाने आतापर्यंत ८६ जागांवरील उमेदवार निश्चित केले आहेत. दुसऱ्या यादीत काही नवे चेहरे, तर काही चर्चेत असलेली नावे समाविष्ट करण्यात आली आहेत.

या यादीतील महत्त्वाचे नाव म्हणजे माजी राज्यपाल आणि भाजपचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य कुम्मनम राजशेखरन. त्यांना आरन्मुला मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेले सीपीआयचे माजी आमदार सी. सी. मुकुंदन यांना नट्टिका मतदारसंघातून संधी देण्यात आली आहे.


भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष बी. गोपालकृष्णन यांना पक्षाने गुरुवायूर मतदारसंघातून उमेदवारी देऊन संधी दिली आहे.

रॉबिन राधाकृष्णन यांना कुंद्रा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात येणार आहे. तर मंजेश्वरममधून के. सुरेंद्रन यांच्या संभाव्य उमेदवारीला विरोध दर्शवल्याची चर्चा असलेल्या भाजपच्या कासारगोड जिल्हाध्यक्ष अश्विनी एम. एल. यांना कासारगोड मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय, मेडिट्रिना हॉस्पिटल ग्रुपचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक आणि हृदयरोगतज्ज्ञ डॉ. एन. प्रताप कुमार यांना कोल्लम मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

## होर्मुझबाहेरून व्यापारी जहाजांना देताहेत संरक्षण

# ओमानच्या आखातात भारतीय युद्धनौका दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** होर्मुझ सामुद्रधुनीभोवती वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने आपल्या व्यापारी जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी ओमानच्या आखातात आणि अरबी समुद्रात अतिरिक्त युद्धनौका तैनात करण्यास सुरुवात केली आहे. या नौका थेट होर्मुझ सामुद्रधुनीत प्रवेश न करता, तिच्या पूर्वेकडील भागात तैनात राहून भारतीय ध्वजांकित जहाजांना उत्तर अरबी समुद्रातील तुलनेने सुरक्षित पाण्यापर्यंत एस्कॉर्ट करतील, असे वृत्त माध्यमांनी सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे.

वृत्तानुसार, रसद पुरवठा करणाऱ्या जहाजांसह अर्धा डझनहून अधिक युद्धनौका या मोहिमेत सहभागी आहेत. या तैनातीचा उद्देश होर्मुझमधील थेट लष्करी सहभाग नसून, भारतीय जहाजांना धोकादायक क्षेत्राबाहेर काढताना सुरक्षा कवच देणे हा आहे. ही कारवाई भारताच्या दीर्घकालीन 'ऑपरेशन संकल्प' चौकटीत होत असल्याचेही वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, इराणकडून अमेरिका आणि इस्रायलवगळता इतर देशांच्या जहाजांना मार्ग देण्याचे संकेत यापूर्वी देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात सामुद्रधुनीतील परिस्थिती अजूनही अस्थिर असून, विमा, सुरक्षा आणि हल्ल्यांच्या धोक्यामुळे जहाजवाहतुकीत अडथळे कायम आहेत.इराण आता होर्मुझमधून जाणाऱ्या जहाजांवर ट्रान्झिट फी किंवा कर लावण्याचाही विचार करत आहे.

या संकटाचा भारतावर थेट परिणाम झाला आहे. भारत आपल्या एलपीजीच्या मोठ्या गरजेसाठी मध्यपूर्वेवर अवलंबून असून, होर्मुझजवळील अडथळ्यांमुळे पुरवठा साखळीवर दबाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर भारताने एलपीजी वाहून नेणाऱ्या दोन सरकारी टँकर्सची सुरक्षित परतफेड करून घेतली असून, इतर अडकलेल्या इंधन जहाजांच्या सुटकेसाठी इराणशी चर्चा सुरू असल्याचेही वृत्तांत म्हटले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी इतर देशांनीही युद्धनौका पाठवून जहाजांना होर्मुझमधून बाहेर काढण्यास मदत करावी, असे आवाहन केले होते. मात्र भारताने या मागणीला थेट प्रतिसाद दिलेला नाही. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या विषयावर अमेरिकेसोबतच्या द्विपक्षीय चर्चेत चर्चा झालेली नसल्याचे सांगितल्याचे वृत्त आहे. भारताची भूमिका पारंपरिकरीत्या अशी राहिली आहे की, कोणत्याही एकतर्फी लष्करी कारवाईचा भाग न होता, आंतरराष्ट्रीय वैधतेच्या चौकटीतच पावले उचलावीत.

पर्शियन आखातात सध्या २२ भारतीय ध्वजांकित जहाजे आहेत. त्यात ६ एलपीजी वाहक, १ एलएनजी जहाज आणि ४ कच्चे तेलवाहू टँकर यांचा समावेश आहे. त्यामुळे भारताने घेतलेली खबरदारी ही केवळ सामरिक नाही, तर ऊर्जा सुरक्षेशी थेट जोडलेली आहे.

या घडामोडींचे गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेशकियन यांच्याशी अलीकडेच चर्चा केली होती. या संवादात आखातातील गंभीर परिस्थिती आणि अडकलेल्या जहाजांच्या सुरक्षित मार्गाबाबतही विचारविनिमय झाल्याचे वृत्त आहे. जागतिक ऊर्जा बाजार आधीच हादरलेला असताना, भारताने समुद्री सुरक्षा, ऊर्जा पुरवठा आणि राजनैतिक संतुलन या तिन्ही आघाड्यांवर सावध पवित्रा घेतल्याचे या हालचालींवरून स्पष्ट होत आहे.